डन्नोचे साहस

04

निकोलाई नोसोव्ह

डन्नो कवी झाला

डन्नोचे साहस

निकोलाई नोसोव्ह

04

डन्नो कवी झाला

रेखाचित्रे: बोरिस कलाउशिन

मराठी: अश्विनी बर्वे

जेव्हा चित्रकार होण्याच्या डन्नोच्या प्रयत्नांतून काहीच निष्पन्न झाले नाही, तेव्हा त्याने कवी व्हायचे ठरवले. तो डँडेलिअन स्ट्रीटमध्ये राहणाऱ्या एका कवीला ओळखत होता. त्या कवीचे खरे नाव टर्निप्स होते, पण सर्वच कवींना सुंदर नावे ठेवायला आवडत असल्याने, त्याने स्वतःसाठी दुसरे नाव निवडले.

तो स्वतःला पोझी म्हणवत असे.

एके दिवशी डन्नो पोझीला भेटायला गेला आणि त्याला म्हणाला: “पोझी, मला लिहायला शिकवा. मला कवी व्हायचं आहे.”

“तुझ्यात काही कला आहे का?” पोझीने विचारले.

"नक्कीच आहे. मी खूप प्रतिभावान आहे," असे डन्नो म्हणाला.

“ते आपण बघूया,” पोझी म्हणाला. “यमक कसं तयार होतं हे तुला माहीत आहे का?”

“यमक? ते काय असतं?”

“एकाच ध्वनीने शेवट होणारे शब्द शोधून यमक तयार होते, जसे की 'टिकल, पिकल', 'बेरी, चेरी'. समजलं का?”

“हो माहीत आहे.”

“मग मला 'वेटर'साठी एक यमक दे.”

“'मिस्टर'," डन्नो म्हणाला.

"मूर्ख," पोझी म्हणाला. "'मिस्टर' आणि 'वेटर' यांचे यमक जुळत नाही."

"का नाही?" डन्नो म्हणाला. "दोघांचाही शेवट सारखाच होतो."

“फक्त शेवटचा ध्वनीच नाही, तर त्याच्या आधीच्या ध्वनीचेही यमक जुळले पाहिजे, जसे की: 'मदर, ब्रदर'; 'सिंपल, पिंपल': 'टेंडर, फेंडर'.”



“आलं, माझ्या लक्षात आलं!” डन्नो ओरडला. “मदर, ब्रदर; सिंपल, पिंपल; टेंडर, फेंडर. यात तर खूप मजा आहे!”

“मग ‘सिझर्स / कात्री’साठी एक यमक जुळवणारा शब्द शोध,” पोझी म्हणाला.

"झिझर्स," डन्नो म्हणाला.

“’झिझर्स' म्हणजे काय?" पोझीने विचारले. “’झिझर्स' असा कोणताही शब्द नाही."

“नाही का?”

“अर्थातच नाही.”

“मग 'फिझर्स’.”

“’फिझर्स' म्हणजे काय? असं विचारलं तर?”

“फिझर्स? अहो, ज्या गोष्टींमध्ये बुडबुडे येतात.”

“तू तो शब्द आत्ताच तयार केला आहे," पोझी म्हणाला.

"असा कोणताही शब्द अस्तित्वात नाही. तुला खरे शब्दच निवडायला हवेत, कोणताही विचित्र शब्द तयार करून चालणार नाही."

“आणि जर मला खरा शब्द निवडता आला नाही तर?”

“याचा अर्थ तुझ्यात काव्यप्रतिभा नाही.”

“ठीक आहे, तू ‘सिझर्स /कात्री'साठी यमक शोधून काढ,” डन्नो म्हणाला.

"फक्त एक मिनिट," पोझी म्हणाला.

तो खोलीच्या मध्यभागी उभा राहिला, छातीवर हात बांधले, मान एका बाजूला झुकवली आणि विचार करू लागला. मग त्याने मान मागे टाकली आणि छताकडे एकटक पाहत विचार करू लागला.

मग त्याने आपल्या हनुवटीला हातांचा आधार दिला आणि जमिनीकडे एकटक पाहत विचार करू लागला.

हे सर्व झाल्यावर तो स्वतःशीच काहीतरी पुटपुटत इकडे तिकडे फिरू लागला:

“सिझर्स, मिझर्स, बिझर्स, निझर्स, रिझर्स ..." तो बराच वेळ पुटपुटत राहिला आणि शेवटी म्हणाला:

“अरे, जाऊ दे! त्या शब्दाला काही यमकच नाही!”

“बघितलंस का!” डन्नो गर्वाने म्हणाला. “तूच मला एक असा शब्द दिलास ज्याला यमक नाही आणि मग म्हणतोस की माझ्यात प्रतिभा नाही.”

"कदाचित तू लिहू शकशील, पण देवासाठी मला एकटं सोड," पोझी म्हणाला. "माझं डोकं गरगरतंय. तुला जे आवडेल ते लिही, फक्त त्यात यमक असायला हवं आणि त्याचा अर्थ लागायला हवा, ती एक कविता होईल."

"हे खरंच इतकं सोपं आहे का?" डन्नो म्हणाला.

“हो, तुला फक्त प्रतिभेची गरज आहे.”

डन्नो घरी गेला आणि तिथे पोहोचल्याबरोबर बसून कविता लिहू लागला.

दिवसभर तो जमिनीकडे तर कधी छताकडे बघत, हातांवर हनुवटी टेकवत, स्वतःशीच काहीतरी पुटपुटत इकडे तिकडे फिरत होता.

शेवटी, कविता तयार झाल्या.

"ऐका मंडळी!" तो म्हणाला. "मी काही कविता लिहिल्या आहेत."
"किती छान! तुझ्या कविता कशाबद्दल आहेत?" त्याचे मित्र म्हणाले.
"तुमच्याबद्दल," डन्नो म्हणाला. "पहिली डूनोबद्दल आहे:

डूनो फिरायला बाहेर गेला.
आणि त्याच्या मार्गात उभ्या असलेल्या
एका कोकऱ्यावरून उडी मारली."

"काय?" डूनो ओरडला. "मी कधी कोकऱ्यावरून उडी मारली आहे का?"

"ते फक्त यमक जुळवण्यासाठी आहे," डन्नोने स्पष्ट केले.

"आणि यमक जुळवण्यासाठी तू माझ्याबद्दल वाट्टेल ते खोटं सांगणार आहेस का?" असं संतप्त होऊन डूनो म्हणाला.

"हो, मला माहीत आहे," डन्नो म्हणाला. "मी खऱ्या गोष्टी रचू शकत नाही, नाही का?"

"तू पुन्हा करून तर बघ!" डूनोने ताकीद दिली. "तू इतरांबद्दलही खोटं बोलला आहेस का?"

"स्विफ्टीबद्दल एक गोष्ट:

भुकेला स्विफ्टी, मी म्हणालो
खाल्ली त्याने इस्त्री, जी होती थंड."

“ऐकलं का?” स्विफ्टी ओरडला. “तो माझ्याबद्दल काय म्हणतो ते ऐकलं का? मी आयुष्यात कधीही थंड इस्त्री खाल्ली नाही!”

“ओरडू नकोस. मी फक्त यमक जुळवण्यासाठी थंड आहे असं म्हटलं.”

“पण मी कधी गरमागरम पण खाल्लं नाही,” स्विफ्टी ओरडला.

“बरं, तू गरमागरम खाल्लं असं मी नाही म्हणालो, त्यामुळे त्यात उत्साही होण्यासारखं काही नाही,” डन्नो म्हणाला.

“आता प्रॅप्सबद्दलची माझी कविता ऐका:

त्याच्या उशीखाली सापडला
अर्धा पौंड वजनाचा एक केक.”

प्रॅप्स धावत त्याच्या पलंगाजवळ गेला आणि त्याने उशीखाली पाहिले.

"माझ्या उशीखाली केक नाही," तो म्हणाला.

"तुम्हाला कविता कळत नाही," डन्नो म्हणाला. "अर्थात, त्यात केक नाहीये. मी फक्त यमक जुळवण्यासाठी तसं म्हटलं. मी डॉ. पिलमन यांच्यावरही एक कविता लिहिली आहे."

“मित्रांनो, आपल्याला हे थांबवावंच लागेल,” डॉ. पिलमन ओरडले. “तो आपल्याबद्दल खोटं बोलत राहात असताना आपण शांतपणे बघत राहायचं का?”

“नाही. आम्ही नाही!” सगळे एकसुरात म्हणाले. “आता हे पुरे झालं! त्या अजिबात कविता नाहीत. तो फक्त आमची चेष्टा करतोय.”

पण डूनो, स्विफ्टी आणि प्रॅप्स यांना इतर कविता ऐकायच्या होत्या.

"त्याला त्या वाचू दे," ते म्हणाले. "जर त्याने आमच्याबद्दल वाचले, तर त्याने तुमच्याबद्दल का वाचू नये?"

“आम्ही हे सहन करणार नाही! आम्ही ऐकणार नाही!” असे बाकीचे ओरडले.

“ठीक आहे, जर तुम्हाला ऐकायचं नसेल, तर मी जाऊन शेजाऱ्यांना वाचून दाखवतो,” डन्नो म्हणाला.

“काय!” ते ओरडले. “शेजाऱ्यांसमोर आमची फजिती करणार! जर तू तसे केले, तर घरी न आलेलेच बरे!”

‘‘माझ्यावर रागावू नकोस,“ डन्नो म्हणाला.

आणि त्याने पुन्हा कधीही कविता न लिहिण्याचा निश्चय केला.